# ओबीसी विद्यार्थ्यासाठी वसतीगृह योजनेतंर्गत प्रवेशासाठी मुद्दतवाढ

**भंडारा** -शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता इतर मागास प्रवर्गातील मुलां/मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झालेली आहे त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरतअसलेल्या मुलां-मुलींच्या वसतिगृहांमध्ये तसेच आधार व स्वयंम योजनेतंर्गत १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे.

उपरोक्त प्रमाणे शासनाच्या https: // hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर शासकीय वसतीगृह असलेल्या जिल्हयासाठी वसतीगृह, पंडित दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना यासाठी १२वी नंतरच्या व्यवसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी आणि पदव्युतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी दि.२६/१०/२०२५ पर्यंत अर्ज भरून ऑनलाईन भरलेला अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधीत वसतिगृहास विहीत मुदतीत सादर करावी. व तसेच शासकीय वसतीगृहासाठी पात्र असलेल्या तथापि गुणवत्तेनुसार व वसतीगृहाच्या क्षमतेअभावी वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्याचे अर्ज पंडित दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी विचारात घेतले जातील. शासकीय वसतीगृह उपलब्ध नसलेल्या जिल्हयासाठी पंडित दिनदयाल स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनांचे दिलेल्या शासनाच्या http: // hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर दि. २६/१०/२०२५ पर्यंत अर्ज भरून ऑनलाईन भरलेला अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधीत वसतिगृहास विहीत मुदतीत सादर करावी. अधिक माहितीकरीता इमाव, विमाप्र व विजाभज मुलां-मुलींचे शासकीय वसतीगृह भंडारा, येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन डॉ. सचिन मडावी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण भंडारा यांनी केले आहे.

# परसवाडा-सिलेगाव अडीच कोटींच्या पुलाचे बांधकाम वर्षभरापासून कासवगतीने सुरू

### बांधकाम विभाभागचा निष्काळजीपणा



**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा दि.११ऑक्टोंबर :** परसवाडा-सिलेगाव मार्गावरील पुलाचे बांधकाम वर्षभरापासून कासवगतीने सुरू असून त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. राज्य शासनाने या पुलासाठी तब्बल २ कोटी ५६ लाखांचा निधी मंजूर केला असला तरीही प्रत्यक्षात कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप पंचायत समिती सदस्य हिरालाल नागपुरे यांनी केला.

यासंदर्भात ठाम भूमिका घेत सार्वजनिक बांधकाम विभागावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवला आहे. सदर काम तातडीने पूर्ण करून वाहतूक सुरळीत करावी. पुलाचे काम अपूर्ण असल्याने पावसाळ्यात पुलाच्या रपट्यावर पाणी साचून वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांना तब्बल तीन किलोमीटर लांबून वाहनी गावावरून वळसा घालावा लागतो. सदर पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम राज्य विभागाच्या अखत्यारीत असूनही अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते पिंटू हूड यांनी केला आहे. लवकरच पुलाच्या कामाला गती देण्यात येणार असून बांधकाम पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, येथे केवळ आश्वासने दिली जात आहे.

**'परसवाडा-सिलेगाव पुलाचे बांधकाम दर्जेदार पद्धतीने व तातडीने पूर्ण करून वाहतूक सुरळीत करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.'**

**हिरालाल नागपुरे, पंचायत समिती सदस्य, सिलेगाव क्षेत्र.**

# नाभिक समाज मंदिर करीता ४० लक्ष देणार

### आ. भोंडेकर यांचे आश्वासन, १५ लक्ष रुपयांचा प्रथम टप्पा मंजूर केला



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.११ऑक्टोंबर :** महाराष्ट्र नाभिक महामंडळ यांच्या मागणीवर आम. नरेंद्र भोंडेकर यांनी नाभिक समाज भवनाकरिता ४० लक्ष रुपयांची निधी देण्याचे आश्वासन दिले आणि याचा प्रथम टप्पा म्हणून १५ लक्ष च्या निधील मंजूरी सुद्धा दिली. आम. भोंडेकर यांच्या द्वारे देण्यात आलेल्या निधी मुळे नाभिक समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र नाभिक समाजाच्या पदाढीकऱ्यांनी आज आमदार नरेंद्र भोंडेकर यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान पदाधिकाऱ्यांनी एक निवेदन द्वारे सांगितले की बेला येथील राजीव नगर स्थित गणेश मंदिर जवळ नाभिक समाजाचे तीन मंजिल समाजभवन उभारण्याची योजना करण्यात आली आहे.

या करिता आम. नरेंद्र बोनडेकर यांच्या कडून अधिकाधिक निधी मिळावी अशी अपेक्षा या निवेदनात वर्तविण्यात आली. ज्यावर आम. नरेंद्र भोंडेकर यांनी तत्काल ४० लक्ष रुपये देण्याचे आश्वासन तर दिलेच सोबतच प्रथम टप्पा म्हणून १५ लक्ष रुपयांची निधी तत्काल मंजूर केली. आम. भोंडेकर द्वारे देण्यात आलेल्या निधी मुळे नाभिक समाजाचे लोकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवेदन देतेवेळी महाराष्ट्र नाभिक समाजाचे जिल्हा अध्यक्ष विजेबहाऊ घाटेकर, कोषाध्यक्ष घनश्याम खडसे, सचिव शरद कुकडकर, सहसचिव कुवरलाल मेश्राम, उपाध्यक्ष नंदकिशोर पारधी, कार्याध्यक्ष दिलीप कुकडकर सह अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# जिंकण्यामुळे आत्मविश्वास वाढतो-शाहेद कुरैशी

### जिल्हास्तरीय शालेय १४, १७ व १९ वर्षाखालील मुला- मुलींचे व्हॉलीबॉल स्पर्धा २६ संघाचा सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.११ऑक्टोंबर :** खेळ नवीन मित्र बनवण्याची आणि आयुष्यभर टिकणाऱ्या मैत्रीचे नाते जोडण्याची संधी देतो. व्हॉलीबॉल सारख्या खेळात खेळाडू चुकांमधून शिकतात आणि जिंकल्यामुळे त्यांच्या आत्मविश्वास वाढतो असे प्रतिपादन क्रीडा संघटक शाहिद कुरेशी यांनी जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटनाप्रसंगी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय भंडारा व जिल्हा वॉलीबॉल संघटना भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय १४, १७ व १९ वर्षाखालील मुला- मुलींचे व्हॉलीबॉल स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल, भंडारा येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. उद्घाटनाप्रसंगी स्पर्धा संयोजक क्रीडा अधिकारी आकाश गायकवाड, भोजराम चौधरी तालुका क्रीडा अधिकारी पवनी, तुमसर तालुका क्रीडा अधिकारी चौगुले मॅडम, संपूर्ण जिल्हयातून आलेले क्रीडा मार्गदर्शक, शिक्षक व खेळाडू विद्यार्थी उपस्थित होते. मैदानाची पूजा करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. जिल्ह्यातील तिन्ही गटातील मुला- मुलींचे एकूण २६ संघांचा समावेश होता. उपांत्य फेरी व अंतिम सामने अत्यंत चुरशीचे झाले.

१४ वर्षे मुलींच्या गटात भंडारा, मुलांच्या गटात लाखनी, १७ वर्ष मुलींच्या गटात पवनी मुलांच्या गटात भंडारा, १९ वर्ष मुलींच्या गटात भंडारा व मुलांच्या गटात भंडारा या संघाच्या प्रथम क्रमांकाने विजयी झाला.

विजय संघ विभागीय स्पर्धेत सहभाग घेतील. स्पर्धेचे आयोजक जिल्हा वॉलीबॉल संघटनेचे सचिव शाहेद कुरेशी, राज्यस्तरीय पंच शोएब शेख, गगन खोब्रागडे, युवराज बोबडे, मुकेश निसाद, भोजराम चौधरी हे होते. विभागीय स्पर्धेसाठी विजय संघाचे अभिनंदन लतिका लेकुरवाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी, सुनील भाऊ फुंडे अध्यक्ष व्हॉलीबॉल संघटना भंडारा, डॉ प्रकाश सिंग, शैलेंद्र सिंग राजपूत, संध्या भोवते, प्रमोद बांते, तुषार मेश्राम यांनी अभिनंदन केले.

# आर्ट्स कॉलेज सिहोरा येथे विश्वविक्रमी सामूहिक विद्यापीठ गीत गायन कार्यक्रम संपन्न



*सिहोरा : सामूहिक गीत गायन करताना मान्यवर व विद्यार्थी*

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा दि.११ऑक्टोंबर :** स्थानिक आर्ट्स कॉलेज सिहोरा येथे महाविद्यालयाच्या प्रांगणात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव सोमनाथे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन चापले सर उपस्थित होते. यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांची विश्वविक्रमी वाटचाल या उपक्रमाला अनुसरून महाविद्यालयात या 'भारतात बंधुभाव नित्य वसु देव,' हे विद्यापीठ गीत सर्वांनी सामूहिक रित्या गायन एकाच ठिकाणी एका सुरात एकाच वेळी करून विश्वविक्रम घडवून आणला.

वरील कार्यक्रमाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. सचिन चापले यांनी ग्रामगीतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले .कार्यक्रमाचे अध्यक्ष सोमनाथे यांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व त्यांचे जीवन चरित्र युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. मनोज सरोदे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. चंद्रशेखर भेजे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.मंजुषा समर्थ, डॉ. मदन प्रधान, डॉ. जयकुमार क्षीरसागर, डॉ. प्रेमा कुंभलकर, प्रा. रेणुका पटले प्रा. राजेश अंबुले, प्रा. रवि पारधी, प्रा. कु.साक्षी मिश्रा तसेच शिक्षकेतर कर्मचारी अविनाश हेडाऊ, कार्तिक टेंभुर्णे, प्रकाश उके, राजकुमार गभणे तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी लक्ष्मण बाणेवार, युगेंद्र पाठक, कु. रिधा शेख, कु. महक कुरेशी, कु. दानिया खान, कु. प्राची चव्हाण, कु. दीक्षा चाचीरे, कु.रीना ढोबळे, कु.शुभांगी कांभारकर, कु. त्रिशा शेंडे, कु. भूमिका पाठक, कु. नीलम शहारे, कु. दीपा भगत, कु. ममता तलवारे, कु. आकांक्षा मडाये, कु. अजमा शेख आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे सहकार्य केले.

# साकोली/ सेंदुरवाफ येथे पोषण अभियान अंतर्गत पालक मेळावा कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.११ऑक्टोंबर :** सरकारच्या पोषण अभियानांतर्गत, एकात्मिक बाल विकास प्रकल्प, ७ ऑक्टोबर २०२५ रोजी साकोली येथील संताजी मंगल कार्यालयात पोषण अभियानाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी नगरसेवक रविभाऊ परशूरामकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी प्रमुख पोलीस पाटील अरविंद निंबेकर, माजी नगरसेवक पी एम कोटांगले, डी जी रंगारी तालुका पत्रकार, प्रीती डोंगरवार, मीनाबाई लांजेवार, भावेश लाजेवार, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमा दरम्यान रविभाऊ परशूरामकर यांनी महिलांना बाल पोषणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यांना संतुलित आहाराचे महत्त्व, लहान मुलांमध्ये कुपोषण रोखण्यासाठी आवश्यक आहार पद्धती आणि गर्भवती आणि स्तनदा मातांसाठी योग्य आहार याबद्दल माहिती देण्यात आली. बाल आरोग्य तपासणीसोबतच, निरोगी मुलांबद्दल माहिती देखील देण्यात आली. 'आई - निरोगी तर मूल निरोगी' हा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान पौष्टिक अन्नाचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. उपस्थितांना हिरव्या भाज्या, फळे, दूध, कडधान्ये यांचा भरपूर आहार घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका गैरवार मॅडम, चंदा सांगोले, साधना मेश्राम, रेखा केचे, चित्रलेखा नंदेश्वर, वनिता रंगारी, तेजस्विनी डोंगरवार,तसेच सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस हेमलता राऊत पदमा चन्ने, वनिता पेंगळे, पुष्पा राऊत, साकशेना राऊत, हिना नंदेश्वर,सहाय्यकांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका गैरवार मॅडम यांनी केले. गौतमी धाडसे चंदा सांगोळे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. वनिता रंगारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# निलज बु. येथील वाळू घाटातून अवैध वाळूची चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी :** तालुक्यातील निलज (बुज) येथील वाळू घाटातून रात्री बारा वाजे नंतर मोठ्या प्रमाणात अवैध वाळूची चोरी सुरू असून पोलिस व महसूल विभाग डोळ्यावर पट्टी बांधून धुतराष्ट्राची भूमिका निभावत आहेत. मोहाडी तालुक्यातील निलज (बुज) हा वाळू घाट असा आहे की येथून पावसाळा असो की उन्हाळा या घाटातून बाराही महिने वाळू चोरी करता येते . याचाच फायदा घेत निलज येथील वाळू चोर वाळू ची चोरी करून महागड्या किमतीत मोहाडी व गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यात मोठ्या प्रमाणात विक्री करतात. करडी पोलीस स्टेशन मधील एक कर्मचारी गोंदिया जिल्ह्यातून येणाऱ्या व नागपूरकडे करडी मार्गे जाणाऱ्या टिप्पर वाल्यांकडून तसेच निलज घाटातून चालणाऱ्या रेती चोर ट्रॅक्टर वाल्यांकडून मोठ्या प्रमाणात हप्ता वसुली करतो याची तक्रार विशेष पोलीस महानिरीक्षक , पोलीस अधीक्षक यांच्याकडे नुकतीच करण्यात आली आहे. परंतु अद्याप त्या कर्मचाऱ्यावर कुठलीही कारवाई झाली नाही. निलज(बुज) येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर नाली बांधकामासाठी ७ ते ८ ट्रॅक्टर वाळू चोरून आणलेली आहे. वाळू चोरी सुरू असताना हप्ता घेणारे पोलिस कर्मचारी गस्तीवर असणाऱ्या ईतर कर्मचाऱ्यांना दुसऱ्या ठिकाणी एखादी घटना घडली असे खोटे सांगून त्याना ईतरत्र पाठवतात व वाळू चोरांना सहकार्य करतात.

वाळू चोरी विषयी गावकरी तहसीलदार प्राजक्ता बुरांडे यांना फोन करतात तर त्या फोन उचलत नाहीत , अशी ओरड गावकऱ्यांची आहे. करडी येथील मंडळ अधिकारी लाखनी येथून ये जा करतात निलज व मोहगाव येथील तलाठी मोहाडी व देव्हाडा येथील तलाठी भंडारा येथून ये जा करतात महसूल विभागाचे कोणीही कर्मचारी परिसरात उपलब्ध नसल्यामुळे वाळू चोरांना मुरूम चोरांना सायंकाळी ५ ते सकाळी ११ वाजे पर्यंत सुवर्णसंधी मिळते . जिल्हाधिकारी यांनी या कामचोर कर्मचाऱ्यावर कारवाई करणे गरजेचे आहे.

# प्रगती महिला कला महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन




# सरपंच अरुण बावनकर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड गाव विकासाच्या मार्गावर!



**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर दि.११ऑक्टोंबर :** तालुक्यातील नांदेड गाव सध्या सरपंच अरुण बावनकर यांच्या नेतृत्वाखाली विकासाची नवी दिशा घेत आहे. 'ग्रामविकास हेच एकमेव ध्येय' या विचाराने काम करत असल्यामुळे, त्यांचे नाव तालुक्यात एक कार्यक्षम लोकप्रतिनिधी म्हणून घेतले जात आहे.

मागील काही वर्षात, सरपंच बावनकर यांनी गावाच्या मूलभूत सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या कामांमुळे नांदेड गाव विकासाच्या मार्गावर झपाट्याने पुढे जात असल्याचे चित्र दिसत आहे.

**प्रमुख कामांचा लेखाजोखा:**

**पाणीपुरवठा योजना:** गावातील नागरिकांना शुद्ध आणि पुरेसे पाणी मिळावे यासाठी त्यांनी प्रभावी पाणीपुरवठा योजना राबवली, ज्यामुळे उन्हाळ्यातही पाण्याची टंचाई जाणवत नाही.

**स्वच्छता आणि आरोग्य:** 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' या धर्तीवर गावात स्वच्छता अभियान नियमितपणे राबवले जात आहे. तसेच, आरोग्य सुविधा सुधारण्यासाठीही त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

**रस्ते आणि दळणवळण:** गावातील अंतर्गत रस्ते पक्के करणे आणि दळणवळण सुविधा सुधारणे यासाठी त्यांनी विविध निधीतून कामे मंजूर करून घेतली आहेत.

सरपंच अरुण बावनकर यांचा केवळ कागदोपत्री कामांवर नव्हे, तर गावातील प्रत्येक नागरिकाशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्यावर भर असतो. त्यांच्या याच लोकसंपर्कामुळे आणि विकासाच्या ध्यासामुळे नांदेड गाव आता इतर गावांना आदर्शवत ठरत आहे.

याबद्दल बोलताना सरपंच अरूण बावनकर म्हणाले, 'नांदेड गावाचा सर्वांगीण विकास करणे हे माझे एकमेव ध्येय आहे. प्रत्येक नागरिकाला चांगले जीवनमान मिळवून देणे ही माझी जबाबदारी आहे. यापुढेही ग्रामस्थांच्या सहकार्याने गावाला प्रगतीपथावर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.'

नांदेड गावाच्या या वाटचाली संदर्भात स्थानिक नागरिक समाधान व्यक्त करत आहेत आणि सरपंच अरुण बावनकर यांच्या नेतृत्वाखाली हे गाव लवकरच एक मॉडेल व्हिलेज म्हणून ओळखले जाईल, अशी आशा बाळगत आहेत .

# माणिकराव सुखदेवे विद्यालयातील विद्यार्थ्यांचा चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.११ऑक्टोंबर :** महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबई द्वारा आयोजित इंन्टरमिडीएट श्रेणी चित्रकला परीक्षा व एलीमेन्ट्री चित्रकला श्रेणी परीक्षेत माणिकराव सुखदेवे विद्यालय अशोकनगर, फुलमोगरा विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला.

विद्यालयातील एलिमेंटरी चित्रकला परीक्षेला १८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

परीक्षेत १८ ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इंटर्मिडीएट चित्रकला परीक्षेत २६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. परीक्षेत २६ ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिल घोल्लर यांचे हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी सचिव अनंत डुंभरे, प्रकाश चौधरी, मुख्याध्यापक सुनिल घोल्लर, गजानन लिचडे, ईश्वरदास लाखडे, श्रावण चव्हाण, प्रतिभा जीभकाटे, जयश्री घोल्लर, रश्मी खोब्रागडे, स्वाती निकोसे, चंचल डुंभरे, राजेश मेश्राम, देवा वाट, धनंजय सेलोकर आदिनी अभिनंदन केले आहे.

# सेवेत राहून बीएड, डीएड प्रशिक्षण घेणारे शिक्षक येणार अडचणीत

**मोहाडी :** शाळेत नियमित कार्यरत असताना एकाच वेळेस व्यावसायिक शिक्षणशास्त्र पदवी , शिक्षणशास्त्र डिप्लोमा ( बी एड , डी एड ) करणारे शिक्षक अडचणीत येणार आहेत. अशा शिक्षकाकडून वेतनातून घेतलेली रक्कम वसूल करण्याचे निर्देश नागपूर शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी सर्व शिक्षणाधिकाऱ्याना दिले आहेत. नागपूर विभागा अंतर्गत कार्यरत शिक्षकांनी अवैधरित्या नियमित डी एड , बी एड केलेल्या शिक्षकांची माहिती एका आठवड्यात देण्याचे निर्देश शिक्षण उपसंचालकानी दिले आहेत. कार्यरत शिक्षकांने नियमित बी एड केल्यास एकाच वेळेस दोन आस्थापनेच्या ठिकाणी उपस्थित राहिलेल्या शिक्षकांचे बीएड अमान्य करण्यात यावे , यापूर्वी आस्थापनेत राहून नियमित बी एड करणाऱ्या शिक्षकांचे लाभ नाकारण्यात आलेले आहेत.

नागपूर विभागामध्ये अनेक शिक्षकांनी शालेत नियमित कार्यरत असताना बीएड चे उच्च शिक्षण प्राप्त केले आहे. शिक्षण शास्त्र पदवी घेण्यासाठी शासनाने मुक्त विद्यापीठ ठरवून दिले होते . मात्र महाराष्ट्रा बाहेर असणाऱ्या विद्यापीठातून बीएडचे प्रशिक्षण अनेक शिक्षकांनी केले आहे. त्या शिक्षकांचे प्रशिक्षण यापूर्वी शिक्षण वीभागाने अवैध ठरविले आहे. विविध शिक्षण संस्थामध्ये सेवेत राहून डीएड, बीएड , बीपीएड करणारे शिक्षक अनेक आहेत , परंतु ही बाब शिक्षणसंस्था संबंधित शाळा व शिक्षकांनी लपवून ठेवलेली आहे. तसेच कार्यरत राहून लाभही घेत आहेत. त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर भार पडत असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. सेवेत असून डीएड , बीएड करणारे शिक्षक किती याबाबत शिक्षण उपसंचालकांनी १७ नोव्हेंबर २०२१ ला माहिती मागवली होती. मात्र नागपूर विभागात येणाऱ्या सर्वच शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षण उपसंचालकांच्या पत्राला जूमानले नाही. आणि कोणतीही माहिती दिली नाही.

महासागर भंडारा
रविवार १२ऑक्टोंबर २०२५
पान ६

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांचा जिल्हा दौरा

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.११ऑक्टोंबर :** जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे गृहराज्यमंत्री(ग्रामिण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार डॉ. पंकज भोयर हे दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे आहे.

दुपारी १२.०० वाजता शासकीय वाहनाने गोंदिया येथून भंडाराकडे प्रयाण करतील.

तसेच रविवार १२ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी भंडारा येथे आगमन जिल्हाधिकारी कार्यालय येथे दुपारी दोन वाजता जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. यानंतर सोईनुसार भंडारा येथून शासकीय वाहनाने प्रयाण करतील.

## सिहोरा येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव आज

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा दि.११ऑक्टोंबर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सिहोरा नगरच्या वतीने विजयादशमी उत्सव आणि शस्त्र पूजन कार्यक्रम रविवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. सिहोरा येथील बाजार चौक येथे सायंकाळी ४:३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या उत्सवासाठी प्रमुख अतिथी म्हणून भालेश्वर तुरकर (सेवानिवृत्त मुख्याध्यापक) उपस्थित राहणार आहेत, तर प्रमुख वक्ता म्हणून विवेक जुमडे (पवनी खंड सहकार्यवाह) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सिहोरा मंडळ कार्यवाह गजानन निनावे यांनी सिहोरा परिसरातील सर्व हिंदू बांधवांनी तसेच गणमान्य व्यक्तींनी या विजयादशमी उत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहन केले आहे.

# साकोली नगर परिषद वर काँग्रेसचा झेंडा फडकणार - नानाभाऊ पटोले




**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.११ऑक्टोंबर :** आगामी साकोली सेंदुरवाफा नगर पालिका निवडणूक संदर्भात साकोली शहर काँग्रेस कमिटी प्रमुख पदाधिकारी यांची सभा आमदार नाना भाऊ पटोले यांच्या अध्यक्षते खाली आमदार जनसंपर्क कार्यालयात पार पडली. सभेला खासदार डॉ प्रशांत पडोळे, जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष मोहन भाऊ पंचभाई, प्रदेश काँग्रेस सचिव प्रसन्न तिडके, माजी जिल्हा परिषद सभापती मदन रामटेके, जी. प. सभापती सौ. शीतल राऊत, किसान सेल जिल्हा अध्यक्ष डॉ अजय तुमसरे,तालुका काँग्रेस अध्यक्ष अशोक कापगते, शहर काँग्रेस अध्यक्ष दिलीप मासुरकर, खरेदी विक्री संचालक मार्तंड भेंडारकर, सौ. छाया पटले, सौ पुष्पा कापगते यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

सभेत नगर परिषद निवडणूक रणनीती, संभाव्य उमेदवार सह इतर मुद्यावर चर्चा करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात आमदार नाना भाऊ पटोले यांनी साकोली शेंदुरवाफा येथील काँग्रेस चे अनुकूल वातावरण असून केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारच्या चुकीच्या ध्येय धोरणा मुळे जनता त्रस्त झालेली आहे. मागील नगर परिषद मध्ये झालेला अनागोंदी कारभारा मुळे मतदार हा काँग्रेस पक्षाच्या बाजूने असल्याने या निवडणुकीत नगर परिषद वर काँग्रेस पक्षाचा झेंडा लागणार त्या करिता कार्यकर्त्यांनी व संभावे उमेदवार यांनी मतदार याद्या जाहीर झालेल्या आहे. त्या घेऊन मतदारांच्या गाठी भेटी घ्यायचे आव्हान आपल्या मार्गदर्शनात भाषणात आमदार नाना पटोले यांनी केले.

सभेचे संचालन शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष दिलीप मासुरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन दिलीप निनावे यांनी केले.

सभेला मनोहर डोंगरे,अश्विन नशीने, संदीप बावनकुडे, उमेश कठाने, विजू दुबे, विजय साखरे, सतीश रंगारी, हेमंत भारतद्वाज, चुन्नीलाल बोरकर, आकाश मेश्राम, वैशाली लांजेवार, कृष्णा हुकरे, तुळशीदास कोरे, त्रिवेणी चौधरी, लीनप्रकाश राऊत,अनिल डोंगरवार, कुणाल राऊत, शैलेश शहरे, सुरेश बोरकर, सुरेखा उंदिरवाडे, सौ शालू नंदेश्वर, सुचिता आगाशे, भाऊराव फुलबांधे, प्रकाश करंजेकर, नामदेव शेंडे, ओमप्रकाश गायकवाड, वैशाली गजभिये, सौ. निर्मला नंदेश्वर, सचिन राऊत, सोनू बैरागी,.स्मिता सिडाम, लीलाबाई वलके, रवींद्र पंचभाई सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## शिवसेना (शिंदे गट)लोकसभा युवा सेना संपर्कप्रमुख श्री जैकी रावलानी ,माजी नगरपरिषद अध्यक्ष भगवान बावनकर यांचा भाजपात प्रवेश



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.११ऑक्टोंबर :** माजी नगरपरिषद अध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री भगवान बावनकर, शिवसेना (शिंदे गट)लोकसभा युवा सेना संपर्कप्रमुख, शिवराज्य वाहतूक सेना नागपूर विभाग अध्यक्ष, विश्व हिंदू परिषद जिल्हा प्रमुख श्री जैकि रावलानी यांनी देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, महसूल मंत्री श्री चंद्रशेखरजी बावनकुळे आणि विधान परिषदेचे आमदार व माजी पालकमंत्री श्री परिणयजी फुके यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा जिल्हाध्यक्ष श्री आशुजी गोंडाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश सोहळा पार पडला. कार्यक्रमाला जिल्हा महामंत्री श्री मयूरजी बिसेन, श्री भगवानजी चांदेवार, सौ. कल्याणीताई निखाडे, भंडारा शहर अध्यक्ष श्री सचिनजी कुंभलकर, बीडीसीसी बँकेचे संचालक श्री रुबीजी चड्डा, श्री संदीपजी मेश्राम, श्री प्रशांतजी निंबोळकर, श्री रोनकजी उजवणे तसेच मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## बावणे कुणबी समाजाचा वर-वधू परिचय मेळावा १२ ऑक्टोबरला भंडाऱ्यात

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.११ऑक्टोंबर :** बावणे कुणबी समाजसेवा मंडळ भंडाराच्या वतीने वर -वधू परिचय मेळावा तसेच कोजागिरी निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १२ ऑक्टोंबर २०२५ ला संत तुकाराम सभागृह भंडारा येथे आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सदानंद इलमे,प्रमुख अतिथी लाखनीचे जयकृष्ण फेंडरकर,साकोलीचे अध्यक्ष डॉ.अजय तुमसरे,तुमसर चे श्रीराम कुकडे,पवनीचे मुनेश्वर गोमासे तसेच परमात्मा एक सेवक मंडळ मोहाडीचे सचिव मोरेश्वर सार्वे उपस्थित राहणार आहेत.

उपवर वधू परिचय मेळावाचे उदघाट दुपारी १२वा. होणार असून हा कार्यक्रम संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुरु राहणार आहे.

सर्व कुणबी शाखीय वर -वधू परिचय आणि नोंदणी केली जाणार आहे. तसेच पुनर्विवाह करू इच्छिणाऱ्यांना देखील नोंद करता येणार आहे.

कोजागिरी महोत्सव निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला असून हा कार्यक्रम संध्याकाळी ६ ते १० असून यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

समाज बांधवांसाठी भोजन आणि दूध वितरण होणार आहे अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष सदानंद इलमे, सचिव प्रभू मने, प्रसिद्धी प्रमुख उमेश सिंगनजुडे तसेच बावणे कुणबी समाजसेवा संघ, महिला समिती, कुणबी युवा समिती यांनी केले आहे.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेअंतर्गत १५ ऑक्टोबरपर्यत सूचना, आक्षेप, हरकती करावेत

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा :** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेअंतर्गत ५० व्या ग्रंथ भेट योजनेसाठी निवड झालेल्या ग्रंथाची मराठी, हिंदी व इंग्रजी यादी ग्रंथालय संचालनालयाच्या www .dol. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत खुली ठेवण्यात आली असून या मुदतीत सूचना, हरकती, आक्षेप मागविण्यात आले आहेत.

तसेच शासनमान्य ग्रंथाच्या यादीसाठी सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या मराठी भाषेतील ग्रंथाची निवड करण्यासाठी ग्रंथ यापुर्वी ग्रंथालय संचालनालयास पाठविले नसल्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, नगर भवन टाऊन हॉल मुंबई-४००००१ या पत्त्यावर १५ ऑक्टोबर २०२५ पर्यत पाठविण्यात यावीत, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी खुमेन्द्र बोपचे यांनी केले आहे.

## स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षणद्वारे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.११ऑक्टोंबर :** भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि बँक ऑफ इंडिया प्रायोजित स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्था, भंडारा संस्थेद्वारा नि:शुल्क ' मोबाईल रिपेअरिंग आणि सर्व्हिस ' (Mobile Repairing and Service) प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात येत आहे.

या प्रशिक्षणामध्ये मोबाईल दुरुस्तीचे मूलभूत ज्ञान दिले जाईल. यात स्मार्टफोनचे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर यांची ओळख, मोबाईलचे विविध भाग जसे की डिस्प्ले, टच स्क्रीन, बॅटरी, चार्जिंग पोर्ट, मायक्रोफोन, स्पीकर, कॅमेरा यांची दुरुस्ती, सॉफ्टवेअर अपडेट, फ्लॅशिंग, डेटा बॅकअप, अँड्रॉइड व ग्धए प्रणाली यांची माहिती, तसेच मोबाईल रिपेअरिंगसाठी लागणाऱ्या उपकरणांचा वापर शिकवला जाईल. प्रशिक्षणादरम्यान सुरक्षितता उपाय, प्रथमोपचार आणि ग्राहक सेवा यावरही मार्गदर्शन केले जाईल. कर्जविषयक मार्गदर्शन, उद्योजकिय कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, प्रकल्प अहवाल, व्यवसाय संधी, बाजार सर्वेक्षण, बँकेच्या योजना, जसे मुद्रा, पीएमईजीपी, स्टँड अप इंडिया व कमजोर वर्गाकरीता वित्तीय योजनांची माहिती दिली जाईल. प्रशिक्षण प्रवेशासाठी आयोजित मुलाखतीस येताना उमेदवारांनी शाळा सोडण्याचा दाखला, गुणपत्रिका, रेशनकार्ड, आधार कार्ड - २, मनरेगा कार्ड जॉब कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींना जेवण, चहा, नाश्ता, वही, पुस्तके व राहण्याची सोय मोफत उपलब्ध करून दिली जाईल. स्वयंरोजगाराची आवड व व्यवसाय करण्याची तयारी असणाऱ्या, वय १८ ते ४५ वर्षे व दहावी पास किंवा नापास अशा पुरुष व महिला उमेदवारांनी दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता, बँक ऑफ इंडिया स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्था, भंडारा लालबहादूर शास्त्री शाळेच्या बाजूला, महाबोधी विहारासमोर, शास्त्री चौक, भंडारा, महाराष्ट्र, ४४१९०४ येथे उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे निर्देशक मिलिंद इंगळे सर यांनी केले आहे. संपर्क:- ९५११८७५९०८, ८६६९०२८४३३, ९७६६५२२९८४, ८४२१४७४८३९.

# कोण बनेगा नगराध्यक्ष?

## साकोली नगराध्यक्षांच्या दावेदारीत सरशी कुणाची होणार




**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.११ऑक्टोंबर :** गत ३ ते ४ वर्षापासून निस्तेज असलेले चेहरे आता कुठे खुलले फुलले. आगामी अल्पावधीत काळात होऊ घातलेल्या नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेली आहे. नगराध्यक्ष पदाची सोडत आणि प्रभागाची सोडत निघायला दोन दिवस झाले नाही पण आतापासूनच भावी नगराध्यक्षांच्या उमेदवारांचे चेहरे प्रभाग क्षेत्रात दिसायला लागले. खरं सांगायचं म्हणजे प्रभागीय उमेदवारांपेक्षा नगराध्यक्षखुर्चीने सध्यातरी सर्वांचे लक्ष वेधलेले आहे. मागील वेळी महिला नगराध्यक्षांची सोडत निघाली होती. त्यामुळे सहाजिकच यावेळी पुरुष उमेदवाराची सोडत निघेल अशी सर्वांनाच अपेक्षा होती. परिणामी सर्वच पुरुष उमेदवारांना हाय व्होल्टेज धक्का बसला. बिचारे गत तीन-चार वर्षापासून नगराध्यक्षासाठी बाशिंग बांधून बसलेल्या भावी उमेदवारांचा हिरमोड झाला. त्यामुळे 'लाडकी बहीण खुश, पण दाजी नाराज' असे चित्र सध्यातरी आहे असे म्हणायला हरकत नाही. ग्रामीण भाषेत दाजी, भाटो आणि भाऊजी असे शब्द बहिणींच्या यजमान करिता वापरले जातात.त्यामुळे भाऊ खुश आहेत. परंतु गृहमंत्री सिंहासनावर विराजमान झाले तरी सूत्र यजमानांच्या हातातच असणार असल्याने थोडेफार आतून खुश आहेत. असो साकोली सेंदुरवाफा नगरपरिषद क्षेत्रात लोकशाही उत्सवाला सुरुवात झालेली आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदाकरिता सर्वच उमेदवारांनी आपापल्या पक्षाकडे उमेदवारी अर्ज सादर केलेले आहेत. विशेष म्हणजे भाजप पक्षाकडून जेव्हा केव्हा नगराध्यक्षाच्या उमेदवाराची घोषणा होईल तेव्हा मात्र फार मोठे वादळ उठणार आहे हे तेवढेच खरे. त्यामुळे पक्ष श्रेष्ठींना मोठा ताण सहन करावा लागणार आहे. खरा पेच असणार आहे तो भाजप पक्षात. स्थानिक स्तरावर स्वतःच्या पक्षाची ताकद दाखविण्या

करिता सर्वच पक्ष स्वतंत्र लढणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे सहाजिकच भाजपच्या उमेदवारांमध्ये कुरघोडी होणार आहे. राष्ट्रवादी (अजित पवार गट) गटातून सध्या तरी दोन नावे सध्या चर्चेत आहेत. त्यात सरिता सुनील फुंडे आणि प्रीती प्रवीण भांडारकर. भाजपकडून माजी पंचायत समिती सदस्य तथा सभापती वैजयंतीताई सतीश कापगते, देवेश्री मनीष कापगते, आणि कल्पना बाळूभाऊ कापगते. प्रशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या आणि शिक्षण विभागात संपूर्ण आयुष्य खर्ची घालणाऱ्या सेवानिवृत्त केंद्रप्रमुख रजनी ग्यानीवंत करंजेकर आणि ज्यांना सेवानिवृत्तीकरिता अल्पावधीचा वेळ आहे आणि ज्यांनी संपूर्ण हयात कृषी क्षेत्रात घालवली त्या प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. उषा डोंगरवार यांच्या नावाची सध्यातरी चर्चा आहे. दोन्ही भावी उमेदवार कोणत्या पक्षातून उभे राहणार हा गोपनीय मुद्दा आहे. जिल्हा परिषद सदस्य असलेल्या प्रा. माहेश्वरी नेवारे यांचे देखील नाव चर्चेत आहे. त्यातही माजी नगरसेवक रवी परशुरामकर यांच्या संसारिक गृहमंत्री ममता परशुरामकर ह्या सुद्धा आघाडीवर आहेत. माजी नगरसेवक राहिलेले रवी परशुरामकर यांचे वलय याची अद्यापही माहिती नाही. कारण सेंदुरवाफा क्षेत्रात मोठे आहे हे विसरून चालणार नाही.

काँग्रेस पक्षातून सुचिता संजय आगाशे तालुका महिला काँग्रेसचे अध्यक्ष पुष्पा कापगते , सुनिता अशोक कापगते यांची नावं समोर आली आहे. सुचिता आगाशे यांच्यातर्फे वर्षभर विविध सामाजिक उपक्रम व कार्यक्रमांमुळे काँग्रेसतर्फे त्यांच्याही विचार केला जाऊ शकतो अशी चर्चा परिसरातील लोकांन मध्ये आहे. सुचिता आगाशे महिला वर्गात परिचित असल्यामुळे पक्षातर्फे त्यांच्या विचार होऊ शकतो, असे कार्यकर्त्यांचे मत आहे.

आता राहिला प्रश्न शिवसेना शिंदे गटाचा. गत निवडणुकीत बंडखोरी केल्याचा आरोप ठेवून काहींची सगळ्याच पक्षाने लक्षात ठेवायला पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. त्यामुळे त्यांनी एकनाथ शिंदे शिवसेना गटात प्रवेश केला. परंतु अल्पावधीत ज्या पद्धतीने साकोली सेंदुरवाफा क्षेत्रात शिवसेना शिंदे गटाने मुसंडी मारली आणि साकोली सेंदुरवाफा नगरपरिषद क्षेत्रात लयभारी ठरलेले आहे. त्यामुळे ऐन मोक्याच्या वेळी जबरदस्त आपले वलय निर्माण केले ते सध्या तरी शिवसेना शिंद गटाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर बावनकर यांच्या मार्गदर्शनात राधेश्याम मुंगमोडे आणि नंदू शेंडे ही कुणाची उमेदवारी ठरवणार हे मात्र बघण्यासारखे राहील.

# लाखांदूर तालुक्यात धान कापणी जोरात; शासकीय खरेदी केंद्र केव्हा सुरू होणार? खरेदी मर्यादा वाढणार का?

**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर दि.११ऑक्टोंबर :** तालुक्यात खरीप हंगामातील धानाची कापणी आता जोरात सुरू झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील धान मळणीसाठी तयार असून काही ठिकाणी मळणीलाही सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे लक्ष आता शासनाच्या आधारभूत धान खरेदी केंद्रांकडे लागले आहे. कापणी झालेल्या धानाची विक्री करण्यासाठी शासकीय खरेदी केंद्र नेमके केव्हा सुरू होणार, हा कळीचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.

**मोजणीसाठी 'लूज' आणि पैशाची मागणी थांबणार का?**

मागील खरेदी हंगामात अनेक आधारभूत केंद्रांवर धान मोजणीच्या वेळी केंद्र चालकांकडून शेतकऱ्यांची खुलेआम लूट करण्यात आल्याच्या तक्रारी होत्या.

**पैशाची मागणी:** धान मोजणीसाठी शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी केली जात होती.

**वजन कपात :** तसेच, प्रत्येक क्विंटलमागे ५ किलो अतिरिक्त धान्याची कपात केली जात होती. १०० किलो धानाची खरेदी करताना केवळ ९५ किलोचे पैसे दिले जात होते. यामुळे शेतकऱ्यांचे दुहेरी आर्थिक नुकसान झाले होते. या हंगामात तरी जिल्हा मार्केटिंग अधिकारी या गंभीर गैरव्यवहाराकडे लक्ष देणार काय? त्यांनी या गैरप्रकारांना कठोरपणे पायबंद घालावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. मोजणीमध्ये होणारी ही लूट आणि पैशाची मागणी तातडीने थांबवण्याची गरज आहे.

**आधारभूत खरेदी केंद्र कधी सुरू होणार?**

तालुक्यात धान कापणीला वेग आला असताना, शासनाकडून अद्याप धान खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. केंद्र लवकर सुरू न झाल्यास शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात व्यापाऱ्यांकडे धान विकावा लागतो, ज्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे, तातडीने खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

**खरेदीच्या मर्यादेबाबत चिंता कायम**

मागील खरीप हंगामात खरेदीची मर्यादा (लिमीट) अत्यंत कमी असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे धान्य आधारभूत केंद्रांवर विक्रीविना पडून राहिले होते. अनेकांना नाइलाजाने कमी दरात खासगी व्यापाऱ्यांना धान विकावा लागला. या पार्श्वभूमीवर, या हंगामात शासनाने प्रति शेतकरी खरेदीची मर्यादा वाढवून द्यावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. जर मर्यादेत वाढ झाली नाही, तर मागील हंगामाप्रमाणेच धान्य पडून राहण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

प्रशासनाने शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन तात्काळ खरेदी केंद्र सुरू करावीत, खरेदीची लिमीट वाढवावी आणि मोजणीतील गैरव्यवहार थांबवावेत, अशी अपेक्षा लाखांदूर तालुक्यातील शेतकरी व्यक्त करत आहेत.

### थकबाकीदारांसाठी एकरकमी परतावा योजना ३१ मार्च २०२६ पर्यत

**भंडारा :** १४ ऑगस्ट,२०२५ रोजीच्या परिपत्रका नुसार थकीत कर्ज प्रकरणात संपूर्ण कर्ज रक्कमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थी यांना थकीत व्याज रक्कमेत ५०/टक्के सवलत देण्याबाबतची एकररक्कमी परतावा योजना ३१ मार्च,२०२६ पर्यत राबविण्यात येत आहे.त्यानुसार महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थीना या योजनेचा लाभ घेऊन कर्ज मुक्त व्हावे असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ भंडारा विभागानी कळविले आहे.

### संजय गाधी निराधार योजना शिबीराचे आयोजन

**भंडारा :** संजयगांधीनिराधार योजना व श्रावणबाळ वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येत असुन माहे डिसेंबर,२०२४ पासुन योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान डी.बी.टी. प्रणालीव्दारे लाभार्थ्यांचे खात्यात जमा करावयाचे असल्याने डी.बी.टी. प्रणालीमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे, तसेच आधार कार्ड व मोबाइल क्रमांक त्यांचे बँक खात्यासह लिंक करणे आवश्यक आहे. करीता तालुकास्तरावर शिबीराचे खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहेत.

## बसपा तालुका अध्यक्ष चेतन बोरकर यांचा वाढदिवस शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून साजरा



**महासागर प्रतिनिधी**
**लाखांदूर दि.११ऑक्टोंबर :** बहुजन समाज पार्टी (बसपा) चे लाखांदूर तालुका अध्यक्ष चेतन बोरकर यांनी आपला वाढदिवस अत्यंत आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा करत सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण दिले आहे. वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी साखरा येथील शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले.

या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वह्या, पेन, पेन्सिल,

**साखरा शाळेत उत्साहात वाटप; सामाजिक बांधिलकीचे दर्शन**

कंपास पेटी, शालेय बॅग तसेच अन्य आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या साहित्य वाटपामुळे विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळाला असून, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता.

यावेळी चेतन बोरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्व पटवून दिले आणि त्यांना भविष्यात यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

'विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य देणे, हा वाढदिवस साजरा करण्याचा सर्वात चांगला मार्ग आहे. यातून सामाजिक जबाबदारीचे भान राहते,' असे मत बोरकर यांनी व्यक्त केले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, मुख्याध्यापक श्री. व्ही. एस. कोकोडे सर, शिक्षिका सी. एन. भंडारे मॅडम,शिक्षकवृंद, ग्रामस्थ तसेच बसपाचे जिल्हा सचिव सोपान दिवठे, साकोली विधानसभा महासचिव चंद्रहास चव्हाण, माजी विधानसभा अध्यक्ष नितीन मेश्राम, युवा आघाडी अध्यक्ष लाखांदूर अधीर आखरे, तालुका सचिव स्वागत मेश्राम, मनीष बनसोड, युवा आघाडी उपाध्यक्ष लाखांदूर कामेश सूर्यवंशी, कन्हैया जांभूळकर, प्रमोद बारसागडे, आदेश शेंडे, छगन हत्तीमारे, नरेंद्र कांबळे, मनोहर सूर्यवंशी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल शालेय व्यवस्थापनाने व पालकांनी चेतन बोरकर यांचे आभार मानले आणि त्यांच्या या सामाजिक कार्याची प्रशंसा केली. बसपा तालुका अध्यक्ष चेतन बोरकर यांच्या या स्तुत्य उपक्रमामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
मालक,मुद्रक,प्रकाशक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,गांधी चौक समोर,भंडारा येथे प्रकाशित केले. संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-सुरेश लक्ष्मण कोटगले, फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

